# लोक महाविद्‌यालय, वर्धा

## समाजशास्त्र विभाग

## <u>अहवाल सत्र 2017-18</u>

सन 2017-18 या सत्रात लोक महाविद्‌यालयात दिनांक 29/09/2017 ला समाजशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. यात समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून सुनिल मडावी या विद्‌यार्थ्यांची निवड करण्यात आली. समाजशास्त्राच्या उद्‌घाटन कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्‌यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ.साहुरकर सर, प्रमुख वक्ते डॉ.माधूरी झाडे डॉ.आंबेडकर समाजकार्य महाविद्‌यालय वर्धा, समाजशास्त्र विभागाचे प्रा.डेहणे मॅडम, प्रा.उमाटे मॅडम व प्रा.पंचभाई मॅडम उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यकारी प्राचार्य डॉ.साहुरकर सर यांनी आपण विचार पुर्वक जगलो पाहिजे, चांगले विचार आपल्यात आले तर समाजामध्ये दिसणा-या विघातक प्रवृत्ती कमी होवून सकारात्मक प्रवृत्ती निर्माण होईल असे आपल्या मार्गदर्शनातून विद्‌यार्थ्यांना सांगीतले. तर प्रमुख वक्ते डॉ.माधूरी झाडे यांनी लोकशाहीमध्ये समाजाला अतिशय महत्व आहे असे आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त केले.

दिनांक 13/10/2017 ला समाजशास्त्र अभ्यास मंडळाव्दारे 'पारले जी' कंपनी नागपूर ला समाजशास्त्राचे विद्‌यार्थी व प्राध्यापक यांनी भेट दिली. 'औद्‌योगिक आधुनिक समाज' या विषयाच्या दृष्टीने उत्पादनाचे पारंपारिक तंत्र व साधनाचा त्याग करुन नविन तंत्र व साधनाचा वापर करुन उत्पादनाच्या क्षेत्रात जी प्रचंड प्रगती घडवून आणली ही जाणिव विद्‌यार्थ्यांना या क्षेत्राच्या प्रत्यक्ष भेटीत झाली.

तसेच समाजशास्त्राच्या पदव्यूत्तर विद्‌यार्थ्यांचे सेमीनार आयोजीत करण्यात आले. त्याकरिता महाविद्‌यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे मॅडम यांचे विद्‌यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

वरील सर्व उपक्रमाकरीता महाविद्‌यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ.पुष्पा तायडे मॅडम, कार्यकारी प्राचार्य डॉ.साहुरकर सर, उपप्राचार्य श्री पाटणे सर, व इतर सर्व प्राध्यापकांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

प्रा.जयश्री डेहणे
समाजशास्त्र विभाग,
लोक महाविद्‌यालय, वर्धा